नागरी स्थानिक संस्थांमध्ये दुहेरी नोंद लेखा पध्दतीची अंमलबजावणी करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : लोलेस-२०१५/प्र.क्र.३३/नवि-३१
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०७ जानेवारी, २०१६.

संदर्भ :- शासन निर्णय क्रमांक लेखासु- १०२००४/७१/प्र.क्र.५/०४/नवि-३१,दिनांक ०६ जुलै, २००५

शासन परिपत्रक

राज्यातील सर्व महानगरपालिका व नगरपरिषदांमध्ये दुहेरी नोंद लेखा पध्दतीची अंमलबजावणी करण्याबाबतचे आदेश उपरोक्त दिनांक ६ जुलै, २००५ शासन निर्णय निर्गमित करण्यात आले होते. त्यामुळे सद्यस्थितीत सर्व महानगरपालिका व नगरपालिकांमध्ये दुहेरी नोंद लेखा पध्दतीची संपूर्ण अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. मात्र तरी देखील लोकलेखा समितीच्या दि. १८.११.२०१५ रोजी झालेल्या बैठकीत द्विनोंद लेखा पध्दतीची अंमलबजावणी सर्वच नागरी संस्थांमध्ये प्रभावीपणे होत नसल्याची बाब समितीच्या सदस्यांनी शासनाच्या निदर्शनास आणली व याबाबत सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना आवश्यक सूचना देण्याचे निर्देशित केले.

२. त्या अनुषंगाने राज्यातील सर्व महानगरपालिका / नगरपरिषदांमध्ये शासन निर्णय दि. ६ जुलै, २००५ अन्वये दिलेल्या सूचनेनुसार उपार्जित तत्त्वावरील दुहेरी नोंद लेखा पध्दतीची अंमलबजावणी कटाक्षाने केली जाईल याची संबंधित आयुक्त/ मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी व्यक्तिश: दक्षता घ्यावी.

३. तसेच, शासन निर्णय दि. ६ जुलै, २००५ नुसार सर्व महानगरपालिका व नगरपरिषदांमध्ये दुहेरी नोंद लेखा पध्दतीच्या अंमलबजावणी बाबत समन्वय व संनियंत्रण ठेवण्याची जबाबदारी समन्वय संस्था (नोडल एजन्सी) म्हणून आयुक्त तथा संचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांची राहील असे स्पष्ट करण्यात आले होते. त्यानुसार राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये दुहेरी नोंद लेखा पध्दतीची अंमलबजावणी होत असल्याबाबत आयुक्त तथा संचालक नगर परिषद प्रशासन संचालनालय यांनी त्यांच्या स्तरावर आढावा घेऊन खातरजमा करावी व आवश्यक तेथे सुधारणात्मक कार्यवाही तातडीने केली जाईल याची सुनिश्चिती करावी. याबाबतचा कार्यपूर्ती अहवाल नगरविकास विभागास दिनांक ३१.०५.२०१६ पूर्वी सादर करावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०११५१६०१३६३२२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने

Pandurang Jotiba Jadhav

Digitally signed by Pandurang Jotiba Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=URBAN DEVELOPMENT DEPT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=300d785e12fdc19db0612f1ffdf83e54efe7da2b1bc63d18df8e09b3c7eece65, cn=Pandurang Jotiba Jadhav
Date: 2016.01.15 16:02:38 +05'30'

(पां. जो. जाधव)
सहसचिव, नगर विकास विभाग

प्रति,

१) सचिव- (नवि-०२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे वरिष्ठ स्वीय सहायक.
२) प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी मुंबई.
४) महालेखापाल (लेखा परीक्षा) १ मुंबई.
५) मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई.
६) आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
७) मुख्याधिकारी, नगरपरिषदा (सर्व)
८) निवड नस्ती.